REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# कौटुंबिक स्थिती व शेतकऱ्यांच्या आत्महत्या



**प्रा.डॉ.रामेश्वर एम.मोरे**
समाजशास्त्र विभाग, संतोष भीमराव पाटील कॉलेज, मंद्रुप.
जि.सोलापूर, महाराष्ट्र.

## प्रस्तावना :-

मानवी समाजाच्या विकासाच्या टप्प्यातील पहिली अवस्था म्हणजे कुटुंब होय. म्हणूनच मानवी समाजाचा इतिहास म्हणजे कुटुंबाचा इतिहास असे म्हटले जाते.बर्जेस आणि लॉक यांच्यामते, कुटुंब हा विवाह, रक्तसंबंध किंवा दत्तकविधान या संबंधाद्वारे निर्माण झालेला असा समूह आहे की, जो एका घरकुलाची निर्मिती करतो व पती-पत्नी, माता-पिता, कन्या-पुत्र, भाऊ-बहिण इत्यादी सामाजिक भूमिका पार पाडत असताना एक सामान्य संस्कृती निर्माण करतो व तिचे रक्षण करतो.

सर्वसामान्यपणे माता-पिता आणि त्यांच्या अपत्यातील संबंधाची व्यवस्था म्हणजे कुटुंब होय. व्यक्ती जन्मापासून मृत्युपर्यंत आपला सर्वाधिक काळ कुटुंबातच व्यतीत करते. व्यक्तीसाठी कुटुंब हे सौख्याचे माहेरघर असते. कुटुंबातच व्यक्तीचे प्राथमिक सामाजीकरण केले जाते. म्हणूनच कुटुंब ही व्यक्तीची पहिली पाठशाळा असते, असे म्हटले जाते. या पाठशाळेत जीवन जगण्याचे धडे देऊन व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण केली जाते. त्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर कुटुंबाचा रचनात्मक प्रभाव असलेला दिसून येतो. कुटुंबाद्वारे प्रजोत्पादन व बालसंगोपनाची कार्ये देखील पार पाडली जातात, ज्यामुळे समाजाचे स्थैर्य व सातत्य टिकून राहते. कुटुंबाद्वारे व्यक्तीला भावनिक आधार प्राप्त होतो ज्यामुळे व्यक्तीला मानसिक सुरक्षितता लाभते. एकूणच, कुटुंबाद्वारे व्यक्ती व समाजाच्या दृष्टीने विविध प्रकारची कार्ये पार पाडली जातात. परंतु वर्तमानस्थितीत कुटुंबाच्या संरचनेत परिवर्तन झाले आहे.

संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन विभक्त कुटुंबाची संख्या वाढत आहे तसेच कुटुंबातही व्यक्तीवादाची प्रवृत्ती वाढत आहे. त्यामुळे प्रेम, सहकार्याची भावना कमी होत चालली आहे. परिणामी भावनिक सुरक्षिततेचे प्रमाण देखील कमी झाले आहे व त्याचाच परिणाम म्हणून आत्महत्यांचे प्रमाणदेखील वाढत आहे. एमिल डरखिम यांनी कौटुंबिक स्थिती व आत्महत्येतील सहसंबंधाचे अध्ययन केले आहे. त्यांच्या अध्ययनातून हे स्पष्ट होते की, ज्या कुटुंबातील सदस्यात प्रेमाचे, वात्सल्याचे, जिव्हाळ्याचे संबंध आहेत, एकमेकांबद्दल सहकार्याची, त्यागाची भावना प्रबळ स्वरुपाची आहे. अशा कुटुंबात आत्महत्येचे प्रमाण कमी असते. थोडक्यात, ज्या कुटुंबात कौटुंबिक एकता प्रभावी आहे तेथे आत्महत्येचे प्रमाण कमी असते तर ज्या कुटुंबातील सदस्यांत प्रेमाचे, वात्सल्याचे, जिव्हाळ्याचे संबंध नसून कौटुंबिक कलहाचे प्रमाण जास्त आहे अशा कुटुंबात आत्महत्येचे प्रमाण जास्त असते. थोडक्यात, कौटुंबिक एकता भंग पावल्यास आत्महत्यांचे प्रमाण वाढते.

यावरुन हे स्पष्ट होते की, आत्महत्या व कौटुंबिक स्थिती यांचा सहसंबंध आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात उस्मानाबाद जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाच्या कौटुंबिक स्थितीचे अध्ययन अनेक पैलूंच्या आधारे केले आहे.

## आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचा कुटुंब प्रकार :

मानवी समाजातील मुलभूत एकक म्हणून कुटुंबाचा उल्लेख केला जातो. कुटुंबाच्या सदस्य संख्येच्या आधारावर केंद्र कुटुंब / विभक्त कुटुंब व संयुक्त कुटुंब असे दोन प्रकार केले जातात. ज्या कुटुंबात पती-पत्नी व त्यांची अविवाहित मुले असतात, अशा कुटुंबास केंद्र कुटुंब / विभक्त कुटुंब असे म्हणतात. तर इरावती कर्वे यांच्या मते, एकाच निवासस्थानात राहणाऱ्या, एकाच स्वयंपाक घरातील अन्न ग्रहण करणाऱ्या, संपत्तीमध्ये समान मालकी असणाऱ्या व धार्मिक

कृत्यात सामूहिकरित्या भाग घेणाऱ्या रक्तसंबंधीयांच्या समूहास संयुक्त कुटुंब म्हणतात. तर डॉ. देसाई यांच्यामते, ज्या कुटुंबात एकापेक्षा अधिक पिढीचा समावेश होतो आणि त्यातील सदस्य उत्पन्न, संपत्ती, अधिकार आणि कर्तव्य याबाबतीत परस्परांशी संबंधित असतात ते संयुक्त कुटुंब होय. कुटुंबाच्या प्रकाराचा देखील व्यक्तीवर एक विशिष्ट प्रभाव असतो. कुटुंब प्रकार व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यातील सहसंबंधाचे अध्ययन अहलावत एस. आर. यांनी केले. त्यांच्या अध्ययनातून हे स्पष्ट होते की, आत्महत्या केलेले ९१% शेतकरी हे विभक्त कुटुंबात राहणारे होते. म्हणून प्रस्तुत अध्ययनात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबप्रकाराचे अध्ययन केले तेव्हा पुढीलप्रमाणे तथ्ये प्राप्त झाली.

**तक्ता क्र. १**

**आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाचा कुटुंबप्रकार दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कुटुंब प्रकार | आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | संयुक्त कुटुंब | २७ | २७% |
| २ | केंद्र / विभक्त कुटुंब | ७३ | ७३% |
| | **एकूण** | **१००** | **१००%** |

वरील तक्ता क्र. १ वरुन असे दिसून येते की, आत्महत्या केलेल्या १०० शेतकऱ्यांपैकी २७ (२७%) शेतकरी हे संयुक्त कुटुंबात राहणारे होते तर ७३ (७३%) शेतकरी हे केंद्र / विभक्त कुटुंबात राहणारे होते.

यावरुन हे स्पष्ट होते की, विभक्त कुटुंबात राहणाऱ्या शेतकऱ्यांत आत्महत्या करण्याचे प्रमाण जास्त आहे. विभक्त कुटुंबात आत्महत्या प्रमाण जास्त असण्यामागे विविध कारणे आहेत. विभक्त कुटुंबात प्रामुख्याने मार्गदर्शनासाठी वडिलधारी मंडळी नसतात तसेच सदस्य संख्या कमी असल्यामुळे भावनिक व मानसिक सुरक्षिततेचे प्रश्न देखील अनेकदा निर्माण होतात. तर उलट संयुक्त कुटुंबात सदस्य संख्या जास्त असते. संकटसमयी भावनिक व मानसिक आधार मोठ्या प्रमाणात मिळतो तसेच विविध प्रसंग वडिलधारी मंडळी मार्गदर्शन करतात. त्यामुळे अनेक संकटांना सहजरित्या सामना करता येतो म्हणून संयुक्त कुटुंबात आत्महत्येचे प्रमाण कमी आहे.

### आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील सदस्य संख्या :

वर्तमानस्थितीत संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन विभक्त कुटुंबाची संख्या वाढत आहे. त्याचबरोबर कुटुंब नियोजनाचा प्रचार-प्रसार मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे सुशिक्षीतांप्रमाणेच अशिक्षीत व्यक्तीदेखील कुटुंबनियोजन करताना दिसत आहेत. त्यामुळे पूर्वीसारखे ३०-४० सदस्य असणारी कुटुंबे कमी झालेली आहेत. सद्यस्थितीत 'हम दो हमारे दो' या उक्तीप्रमाणे लोक वागताना दिसून येत आहेत. परंतु यामुळे लोकांना एकाकीपणाच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. हा एकाकीपणादेखील काही प्रमाणात आत्महत्येस जबाबदार ठरतो का? हे जाणून घेण्यासाठी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यसंख्येचे अध्ययन केले तेव्हा खालीलप्रमाणे तथ्ये प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २**

**आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यसंख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कुटुंबातील सदस्यसंख्या | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ०१ | ०३ | ०३% |
| २ | ०२ ते ०४ | ५१ | ५१% |
| ३ | ०५ ते ०७ | ३० | ३०% |
| ४ | ०८ ते १२ | १२ | १२% |
| ५ | १२ पेक्षा जास्त | ०४ | ०४% |
| | **एकूण** | **१००** | **१००%** |

वरील तक्त्याचे अध्ययन केल्यास असे लक्षात येते की, आत्महत्या केलेल्या १०० शेतकऱ्यांच्या कुटुंबापैकी सद्यस्थितीत ०१ सदस्यसंख्या असणारी कुटुंबे ०३ (०३%) आहेत तर ०२ ते ०४ सदस्यसंख्या असणारी ५१ (५१%) कुटुंबे

आहेत. त्याचबरोबर ०५ ते ०७ सदस्यसंख्या असणारी ३० (३०%) कुटुंबे आहेत तर ०८ ते १२ सदस्यसंख्या असणारी १२ (१२%) कुटुंबे आहेत आणि १२ पेक्षा जास्त सदस्यसंख्या असणारी ०४ (०४%) कुटुंबे आहेत.

यावरुन हे स्पष्ट होते की, आत्महत्या केलेले सर्वाधिक शेतकरी हे ०२ ते ०४ सदस्यसंख्या असणाऱ्या कुटुंबातील होते. तसेच ०५ ते ०७ सदस्यसंख्या असणाऱ्या कुटुंबात देखील आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. तर ८ ते १२ व १२ पेक्षा जास्त सदस्यसंख्या असणाऱ्या कुटुंबात आत्महत्येचे प्रमाण कमी आहे.

यावरुन असा निष्कर्ष काढता येतो की, कमी सदस्यसंख्या असणाऱ्या कुटुंबात आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे तर जास्त सदस्यसंख्या असणाऱ्या कुटुंबात आत्महत्येचे प्रमाण कमी आहे. याचे कारण म्हणजे कमी सदस्यसंख्या असणाऱ्या कुटुंबात व्यक्ती अधिक काळ एकलकोंडे राहते. त्यामुळे आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे तर जास्त सदस्य असणाऱ्या कुटुंबात व्यक्ती कोणाच्या न कोणाच्या संपर्कात राहते. तसेच तेथे भावनिक व मानसिक सुरक्षितता अधिक मिळते, त्यामुळे जास्त सदस्यसंख्या असणाऱ्या कुटुंबात आत्महत्येचे प्रमाण कमी आहे.

**विभक्त झाल्यापासूनचा कालावधी :**

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांमध्ये विभक्त कुटुंबात राहणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे हे शेतकरी केंव्हापासून विभक्त राहत होते याचे अध्ययन केले, तेंव्हा पुढीलप्रमाणे तथ्ये प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३**

**आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे कुटुंब मुळ कुटुंबापासून विभक्त झालेला कालावधी दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विभक्त झाल्यापासूनचा कालावधी | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ०१ वर्ष | ०१ | ०१% |
| २ | ०२ ते ०३ वर्ष | ०१ | ०१% |
| ३ | ०४ ते ०५ वर्ष | ११ | ११% |
| ४ | ०५ ते १० वर्ष | २८ | २८% |
| ५ | १० ते १५ वर्ष | १७ | १७% |
| ६ | १५ वर्षापेक्षा जास्त | १५ | १५% |
| ७ | लागू नाही | २७ | २७% |
| | **एकूण** | **१००** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, आत्महत्या केलेल्या १०० शेतकऱ्यांपैकी ७३ (७३%) शेतकरी विभक्त कुटुंबात राहत होते. त्यापैकी ०१ वर्षापासून विभक्त राहणारे ०१ (०१%) शेतकरी होते तर ०२ ते ०३ वर्षापासून विभक्त राहणारे ०१ (०१%) शेतकरी होते. ०४ ते ०५ वर्षापासून विभक्त राहणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ११ (११%) होते तर ५ ते १० वर्षापासून विभक्त राहणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २८ (२८%) होते. १० ते १५ वर्षापासून विभक्त राहणारे १७ (१७%) शेतकरी होते तर १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून विभक्त राहणारे १५ (१५%) शेतकरी होते. तर २७ (२७%) शेतकरी संयुक्त कुटुंबात राहत होते, त्यामुळे त्यांच्यासाठी हे अध्ययन लागू नाही.

यावरुन हे स्पष्ट होते की, विभक्त झाल्यानंतर लगेच १, २, ३ वर्षात आत्महत्येचे प्रमाण कमी आहे, परंतु जसजसा कालावधी वाढत जाईल तसे आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. प्रामुख्याने ५ ते १० वर्ष व १० ते १५ वर्ष इतका कालावधी झालेल्या विभक्त कुटुंबात आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. याचे कारण म्हणजे सुरुवातीच्या दोन-तीन वर्षात मुले लहान असतात तर नंतर हळूहळू ती मोठी होतात व कुटुंबाचा खर्च वाढत जातो. शेतकरी दरवर्षी उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करतो, परंतु ते वाढत नाही. त्यामुळे खर्च व उत्पन्न यात ताळमेळ बसत नाही, त्यामुळे कुटुंबात वाद होतात. तसेच त्यांच्यात देखील नैराश्य वाढत जाते, त्यामुळे तो आत्महत्येस प्रवृत्त होतो.

**आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाचा आत्महत्येपूर्वीचा कुटुंबप्रमुख :**

कुटुंबामध्ये कुटुंबप्रमुखाची भूमिका मुलभूत स्वरुपाची असते. प्रामुख्याने सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या याच व्यक्तीवर असतात. त्यामुळे अनेकदा कुटुंबप्रमुखांना विविध संकटांना सातत्याने तोंड द्यावे लागते. त्यातून मानसिक तणावदेखील वाढत जातो. हा मानसिक तणावदेखील काही प्रमाणात आत्महत्येस जबाबदार ठरतो. म्हणून आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबात आत्महत्येपूर्वी कुटुंबाचा प्रमुख कोण होता याचे अध्ययन केले. तेव्हा पुढीलप्रमाणे तथ्ये प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४**
**आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाचा आत्महत्येपूर्वीचा कुटुंबप्रमुख दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | आत्महत्येपूर्वीचा कुटुंबप्रमुख | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आत्महत्या केलेली व्यक्ती | ९० | ९०% |
| २ | इतर व्यक्ती | १० | १०% |
| | **एकूण** | **१००** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, आत्महत्या केलेल्या १०० शेतकरी कुटुंबापैकी ९० (९०%) शेतकरी कुटुंबात कुटुंबप्रमुख ही आत्महत्या केलेली व्यक्तीच होती तर १० (१०%) शेतकरी कुटुंबात कुटुंबप्रमुख या इतर व्यक्ती होत्या.

यावरुन हे स्पष्ट होते की, आत्महत्या केलेल्या सर्वाधिक शेतकरी कुटुंबात आत्महत्येपूर्वी आत्महत्या केलेली व्यक्तीच कुटुंबप्रमुख होती, तर इतर व्यक्ती कुटुंबप्रमुख असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण फार अल्प आहे.

## निष्कर्ष -

**आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबात ७३% विभक्त कुटुंब आहेत. तर २७% संयुक्त कुटुंब आहेत. यावरुन हे स्पष्ट होते की, संयुक्त कुटुंबापेक्षा विभक्त कुटुंबात राहणाऱ्या शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. मार्गदर्शनाचा अभाव, भावनिक व मानसिक आधाराचा अभाव, कौटुंबिक वाद व इतर विविध कारणांमुळे विभक्त कुटुंबात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. विभक्त झाल्यापासून ५ वर्ष ते १५ वर्ष झालेल्या कुटुंबात जबाबदाऱ्या जसजशा वाढत जातील तसतसे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत जाते.आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी ९०% शेतकरी हे आत्महत्येपूर्वी कुटुंबप्रमुख होते. कुटुंबप्रमुख म्हणून योग्य प्रकारे जबाबदारी सांभाळता येत नसल्याची खंत त्यांच्या मनात होती. ही खंत बहुतांश शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरली आहे.**

## संदर्भ सूची :-


१) वैद्य नी. स. (१९७५), समाजशास्त्रीय विचार परंपरा, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, विद्या प्रकाशन, नागपूर.

२) Durkhiem Emile (१८९७), Suicide A study in Sociology, Translated by John A. S. Paulding and George Simpson (१९६८)] Routledge S. Kegan Paul Ltd., London Ec. ४.

३) डरखिम एमिल (१८९७), आत्महत्या समाजशास्त्रीय अध्ययन, अनुवादक- रामकिशन गुप्त (२००८), ग्रंथ शिल्पी (इंडिया) प्राईवेट लिमिटेड, दिल्ली.

४) दोषी एस. एल. एवं जैन पी. सी. (१९९९), सामाजिक विचारक, रावत पब्लिकेशन्स, जयपूर एवं नई दिल्ली.

५) तंगलवाड डी. एम. व घोडगे डी. डी. (२००७), समाजशास्त्रीय विचारवंत, ज्ञानोदय प्रकाशन, औरंगाबाद.

६) बोबडे प्रकाश (२००१), भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

७) What do you mean by Joint family. http://www.preservearticles.com

८) Ahlawat S. R. (२००३), 'Sociology of Agrarian Crisis : Peasant Suicides and Emerging Challanges', Man & Development Vol.XXV, ०३ Sep. २००३.

९) Mishra Srijit and other (२००६)- Suicide of farmers in Maharashtra (Submitted to the Government of Maharashtra), Indira Gandhi Institute of Development Research, Mumbai, २६ Jan, २००६. www.igidr.ac.in/conf/suicide/finalreport_SFM_IGIDR२६Jan०६_Pdf.

१०) कुरुलकर आर. पी. (२००७), मराठवाड्यातील शेती व शेतकऱ्यांच्या आत्महत्या, समाजप्रबोधन पत्रिका, जानेवारी-मार्च २००७.